# - प्रकरण सातवे -

## बँकेची शैक्षणिक कार्य


७.१ प्रस्तावना.

७.२ बालवाडी शिक्षण.

७.३ प्राथमिक शिक्षणाची सोय.

७.४ लोकसेवक आ.बा. नाईक विद्यामंदीर.

७.५ माध्यमिक शिक्षणाची सोय.

७.६ उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज.

७.७ समारोप.


.....

# प्रकरण सातवे

## बँकेचे शैक्षणिक कार्य

### ७.१) प्रस्तावना :-

पैसाफंड बँकेस नियमाच्या चाकोरीतून ज्या सेवा देणे शक्य आहे व कर्पाला बेतेल अशा सेवा पुरविण्याचे काम सातत्याने करीत आहे. शिक्षणाने ज्ञान व ज्ञानाने मानवी जीवन सुकर होते. शिक्षणासाठी विविध सुविधा स्थापनेपासून बँकेने पुरविलेल्या आहेत. गरीब विद्यार्थ्यांना बुक बँकेतून पुस्तक सहाय्य कामधंदा व धंदे शिक्षण, शालेय साहित्य, बालवाडीतील मुलांची फी व उच्च शिक्षण बिनव्याजी कर्ज अशा सेवा संस्थेने आतापर्यन्त पुरविल्या आहेत व त्या चालूही आहेत. त्याचा सविस्तर तपशिल पुढील प्रमाणे :

### ७.२) बालवाडी :-

दिनांक २७ एप्रिल, १९६८ पासून प्रत्येक बालवाडीतील १० गरीब व मागासवर्गीय मुलांची फी, बालवाडी, मुलांच्यासाठी खेळणी, पिण्याच्या पाण्याची सोय, शैक्षणिक साहित्य, गणवेश व इतर साहित्य, सुविधा उपलब्ध करून लहान मुलांना शिक्षणाची व संस्काराची कवाडे खुली करून दिली आहेत.

पुढील तक्ता क्र.७.१ वरून बँकेने या कार्यावरती प्रत्येक वर्षी केलेला खर्च आणि बालकांची संख्या दिसून येते.

तक्ता क्र.७.१

बालवाडी शिक्षण - लाभधारक मुलांची संख्या आणि खर्च (रुपये)

| वर्ष | लाभधारक मुलांची संख्या | खर्च(रुपये) |
|---|---|---|
| १९६८-७२ | ५० | उ.ना. |
| १९७३-७८ | १२० | उ.ना. |
| १९७९-८५ | २१० | उ.ना. |
| १९८५-८६ | ५० | ८६० |
| १९८६-८७ | २०० | १,४०० |
| १९८७-८८ | २०० | १,३८० |
| १९८८-८९ | ६० | १,२४३ |
| १९८९-९० | ८० | ७४० |
| १९९०-९१ | ६० | २,२८८ |
| १९९१-९२ | ६० | ६६८ |
| १९९२-९३ | ६० | ८०० |

तक्ता क्र•७•१ वरून असे स्पष्ट दिसून येते की, सन १९८५ नंतर प्रत्येक वर्षी मुलांची संख्या आणि त्यावरती खर्च करण्यात येणारी रक्कम वाढत गेलेली दिसते• सन १९९०-९१ यावर्षी लाभधारक मुलांची संख्या ६० असून देखील खर्च रुपये २,२८८/- आहे• कारण फी ची रक्कम वाढली व तसेच शालेय साहित्यांच्या किंमती वाढल्यामुळे हा खर्च जास्त आहे•

सन १९८९-९० या वर्षी बँकेने बालकवर्ष साजरे करून सदृढ बालक व माता स्पर्धांचे आयोजन करून त्यासाठी रुपये १,९४४/- खर्च केला आहे•

७•३) प्राथमिक शिक्षणाची सोय :-

दत्तक पालक योजना या सदराखाली संस्थेने लोकसेवक आ•बा• नाईक विद्यालय व कन्या विद्यामंदीर, हुपरी च्या प्रत्येक पाच विद्यार्थिनींची गणवेश, पुस्तके व इतर शालेय सोई उपलब्ध करून त्यांना शिक्षणाची कवाडे खुली केली आहेत•

तक्ता क्र•७•२ वरून सविस्तर माहिती मिळते•

तक्ता क्र.७.२

प्राथमिक शिक्षणाची सोय - प्राथमिक शिक्षणासाठी बँकेने दिलेली देणगी.

| वर्ष | रक्कम (रुपये) |
|---|---|
| १९६०-६१ | १०१ |
| १९७०-७१ | २०० |
| १९७६-७७ | २०० |
| १९७७-७८ | २०० |
| १९७८-७९ | ४०० |
| १९७९-८० | उ.ना. |
| १९८०-८१ | उ.ना. |
| १९८१-८२ | उ.ना. |
| १९८२-८३ | उ.ना. |
| १९८३-८४ | उ.ना. |
| १९८४-८५ | उ.ना. |
| १९८५-८६ | ४६८ |
| १९८६-८७ | ६८९ |
| १९८७-८८ | १,०९९ |
| १९८८-८९ | ८०० |
| १९८९-९० | ९९३ |
| १९९०-९१ | १,००० |
| १९९१-९२ | २,५०१ |
| १९९२-९३ | ३,७९७ |

सन १९६१ पासून सन १९७४ पर्यन्त प्रत्येक शाळेत पहिल्या येणा-या विद्यार्थ्यास प्रत्येकी १० रुपये प्रमाणे एका वर्षाची शिष्यवृत्ती बँक देत होती.

तक्ता क्र.७.२ वरुन असे दिसते की, प्राथमिक शिक्षणावर होणारा बँकेचा खर्च सन १९८५-८६ पासून सातत्याने वाढत आहे. किंमत पातळीतील वाढीबरोबर या खर्चात वाढ होत आहे. सन १९८५-८६ मध्ये हा खर्च रुपये ४६८ होता. तर सन १९९२-९३ मध्ये प्राथमिक शिक्षणावरील खर्च रुपये ३,७९७/- इतका झाला. त्याचा लाभ ३० विद्यार्थ्यांना झाला.

## ७.४) लोकसेवक आ.बा. नाईक (दादा) विद्यामंदीर :-

स्वर्गीय आ.बा. नाईक (दादा) यांच्या लोककल्याणकारी योजनेचा वारसा म्हणून दादांच्या कल्पनेतून साकार झालेल्या, या विद्या-मंदीराच्या इमारतीस जिल्हा परिषदेने त्यांचे नाव देऊन गौरव केला. सदर इमारतीच्या खोल्यांचे मासिक उत्पन्न पैसाफंड बँकेच्या नफ्यात जमा न करता, शिक्षणासाठी व्यवस्था व इतर दुरुस्ती या कारणासाठी खर्च केला जातो. शिवाजीनगर व नवीन वसाहतीमधील बालवाडीची गैरसोय दूर करण्यासाठी सदर योजनेतून इमारत बांधून लोकसेवक आ.बा. नाईक बालवाडी व वाचनालय दिनांक २० डिसेंबर, १९९० पासून सुरु करण्यात आली आहेत.

७.५) माध्यमिक शिक्षणाची सोय :-

माध्यमिक शिक्षणाची गरीब विद्यार्थ्यांना सोय व्हावी, म्हणून हायस्कूलमध्ये बँकेने सन १९६१ पासून पुस्तकासाठी देणगी दिली आहे. त्याची सांख्यकिय माहिती तक्ता क्र.७.३ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र.७.३

माध्यमिक शिक्षणाची सोय - बँकेने पुस्तकासाठी हायस्कूलला दिलेली देणगी (रुपये).

| वर्ष | देणगी (रुपये) |
|---|---|
| १९६०-६१ | १०० |
| १९७०-७१ | ८०० |
| १९७१-७२ | ५०० |
| १९७२-७३ | उ.ना. |
| १९७३-७४ | ७०० |
| १९७४-७५ | १,००० |

सन १९७५ पर्यन्त गरीब मुलांच्या सोयीसाठी बँक हायस्कूलला देणगी देत होती. सन १९७४-७५ मध्ये अशी रुपये १,०००/- ची देणगी बँकेने दिली.

सन १९७५ नंतर मात्र गरीब विद्यार्थ्यांना पुस्तकांचा संच घेणे अवघड पडते असे लक्षात आल्यानंतर गरीब विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून, २ ऑगष्ट, १९७५ साली हुपरी इंग्लीश स्कूल येथे बुक बँकेची स्थापना करून पुस्तकांचे संच उपलब्ध करून दिले. त्यासाठी नाममात्र रुपये १/- नोंदणी फी भरून वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून तो संच बुक बँकेकडे पुन्हा जमा केला जातो. सन १९९२-९३ पर्यन्त बुक बँकेसाठी बँकेने रुपये ५३,७२७/- ची क्रमिक पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. त्याचा लाभ हुपरी व पंचक्रोशीतील १,२०० विद्यार्थी घेत आहेत.

त्याचप्रमाणे बँकेने गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून त्यांच्या परीक्षा फी-पोटी मदत देऊन विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यास सहाय्य केले आहे. त्याचा तपशील तक्ता क्र.७.४ मध्ये दिला आहे.

तक्ता क्र.७.४

गरीब विद्यार्थ्यांची फी - विद्यार्थ्यांची संख्या आणि फी ची रक्कम.

| वर्ष | लाभधारक विद्यार्थी | फी (रुपये) |
|---|---|---|
| १९८१-८२ | उ.ना. | उ.ना. |
| १९८२-८३ | ५ | ३५५ |
| १९८३-८४ | ४ | २२७ |
| १९८४-८५ | उ.ना. | उ.ना. |
| १९८५-८६ | उ.ना. | उ.ना. |
| १९८६-८७ | उ.ना. | ३५० |
| १९८७-८८ | उ.ना. | ६०० |
| १९८८-८९ | २० | ७०० |
| १९८९-९० | २० | १,५०० |
| १९९०-९१ | १० | ६१९ |
| १९९१-९२ | ११ | ७०० |

तक्ता क्र.७.४ वरून असे दिसून येते की, बँकेच्या या कार्याचा फायदा घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. १९८२-८३ मध्ये ५ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला.. तर १९८८-८९ मध्ये २० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. फी साठी बँकेने दिलेली मदत देखील वाढलेली आहे. सन १९८९-९० मध्ये या योजनेअंतर्गत बँकेने रूपये १,५००/- ची मदत केली.

७.६) <u>उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज</u> :-

बँकेच्या दीर्घ मुदतीच्या कर्ज योजनेचा फायदा घेऊन बँकेच्या कार्यक्षेत्रातील बरेच विद्यार्थी आपले उच्च शिक्षण पुरे करू शकले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची आर्थिक कुचंबना लक्षात घेऊन बँकेने सुरू केलेली ही योजना बँकेची शिक्षण विषयक आस्था व पुरोगामी धोरण यांचे प्रतिक आहे. बँकेने या योजनेखाली उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी केलेला बिनव्याजी कर्जाचा पुरवठा पुढील तक्ता क्र.७.५ मध्ये दिला आहे.

तक्ता क्र.७.५

उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज - लाभधारक आणि दिलेली कर्जे (रुपये)

| वर्ष | लाभधारक | कर्ज (रुपये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १९६९-७० | १४ | ६,१०० |
| १९७०-७१ | १४ | १,४०० |
| १९७१-७२ | १३ | २,००० |
| १९७२-७३ | ७ | १,१०० |
| १९७३-७४ | १३ | ३,४५० |
| १९७४-७५ | १० | २,६५० |
| १९७५-७६ | उ.ना. | उ.ना. |
| १९७६-७७ | उ.ना. | उ.ना. |
| १९७७-७८ | १६ | ३,६०० |
| १९७८-७९ | उ.ना. | २,७५० |
| १९७९-८० | उ.ना. | १,९५० |
| १९८०-८१ | उ.ना. | १,४०० |
| १९८१-८२ | उ.ना. | १,७५० |
| १९८२-८३ | ३ | १,२०० |
| १९८३-८४ | ४ | १९,६२४ |
| १९८४-८५ | उ.ना. | १८,९७० |

.....

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| १९८५-८६ | उ॰ना॰ | १६,२२६ |
| १९८६-८७ | उ॰ना॰ | १४,७०६ |
| १९८७-८८ | उ॰ना॰ | १८,३१७ |
| १९८८-८९ | - | २९,९६५ |
| १९८९-९० | - | ४४,७६३ |
| १९९०-९१ | - | ५५,११० |
| १९९१-९२ | - | ६९,६२३ |

तक्ता क्र॰७॰५ वरून असे निदर्शनास येते की, प्रत्येक वर्षी या योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे॰ परिणामी या योजनेमुळे अनेक हुषार, गुणी विद्यार्थ्यांचा उत्कर्ष होण्यास मदत होत आहे॰ बँकेने या योजनेअंतर्गत १९९१-९२ मध्ये रूपये ६९,६२३/- ची कर्जे दिली आहेत॰

७.७) <u>समारोप</u> :-

वर उल्लेखिल्याप्रमाणे बँकेने शैक्षणिक कार्यात विशेष रस घेऊन मोलाची भर घातली आहे. इतकेच नव्हे तर धंदे शिक्षण विभागांतर्गत टाईपराइटिंग शिक्षण वर्ग हुपरी इंग्लीश स्कूल, हुपरी येथे चालू केले आहेत. त्याचबरोबर हुपरी परिसरातील पट्टण-कोडोली, सांगाव, रेंदाळ व हुपरी येथील हायस्कूलमध्ये कार्यानुभव विषयाचे शिक्षण देण्यात येते. या शिक्षणासाठी लागणारे भांडवली साहित्य बँकेने पुरविले आहे. त्यामध्ये स्टोव्ह दुरुस्ती, विजेवर चालणारी उपकरणे, पुस्तक बांधणी, सर्वसामान्य हत्यारांचा उपयोग इत्यादी बाबींचे शिक्षण देण्यात येते. या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्यामध्ये काम करण्याची आवड व कौशल्य निर्माण होते. भावी जीवनात या गोष्टींचा फार मोठा उपयोग विद्यार्थ्यांना होतो. एकंदरीत पैसाफंड बँकेने हाती घेतलेल्या सामाजिक कार्यात हुपरी परिसरातील लोक उत्स्फूर्तपणे व सक्रिय सहभागी होतात आणि हाच अनुभव या शैक्षणिक कार्यात देखील आला.

.....